# मिरा भाईंदर महानगरपालिका
# माहिती व जनसंपर्क विभाग
# प्रसिद्धी पत्रक

## ❖ राधाबिनोद शर्मा यांनी मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या आयुक्तपदाचा पदभार स्वीकारला

मिरा-भाईंदर महानगरपालिकेचा आयुक्त आणि प्रशासक म्हणून मा. राधाबिनोद शर्मा यांनी शुक्रवार, ७ मार्च रोजी अधिकृतपणे पदभार स्वीकारला. त्यांनी भाईंदर येथील महानगरपालिकेच्या मुख्यालयात हजर राहून जबाबदारी स्वीकारली. या वेळी महापालिकेतील वरिष्ठ अधिकारी आणि कर्मचारी वर्गाने त्यांचे उत्साहात स्वागत केले.

राधाबिनोद शर्मा हे २०१२ बॅचचे आयएएस अधिकारी असून, त्यांनी यापूर्वी जिल्हाधिकारी, बीड आणि औरंगाबाद यासारख्या महत्त्वाच्या पदांवर काम केले आहे. तसेच, त्यांनी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणात (एमएमआरडीए) सह महानगर आयुक्त म्हणूनही कार्यभार सांभाळला होता, अर्थात त्यांना ग्रामीण आणि शहरी समस्यांची जाण आहे यामुळे त्यांचा अनुभव मिरा भाईंदरच्या विकासासाठी निश्चितच महत्त्वाचा ठरेल.

आयुक्तपद स्वीकारल्यानंतर त्यांनी शहराच्या विकासासाठी महत्त्वपूर्ण उपक्रम राबविण्याचा संकल्प व्यक्त केला. यात त्यांनी शिक्षण आणि आरोग्य यांवर भर देण्याचा निश्चय केला आहे. तसेच त्यांनी 'स्वच्छ, हरित, स्मार्ट—सर्वांसाठी प्रगतीशील मीरा भाईंदर!' (Clean, Green, Smart—A Progressive Mira Bhayandar for All!) असे ध्येय ठरविले आहे. यासह, मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या विविध प्रकल्पांना गती देऊन, पायाभूत सुविधा सुधारणे आणि नागरी सेवांचा दर्जा उंचावणे हे त्यांचे प्रमुख उद्दिष्ट राहणार आहे.